कला अकादमी गोवा
कांपाल – पणजी
कअ/काविवि/ति.दि/२०२५–२६/८३२
दि.०८/०७/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला गोवा कला अकादमीतर्फे **“बोलावा विठ्ठल”** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझा या संस्थेचे सदस्य सचिव श्री. अशोक परब याच्या हस्ते समई प्रज्वलीत करुन करण्यात आले. या प्रसंगी मान्यवर कलाकारांबरोबरच कला अकादमीचे कार्यक्रम व विकास अधिकारी श्री. प्रदीप गावकर, निर्मिती व्यवस्थापक श्री. प्रेमानंद पोळे व नाटयगृह सहायक व्यवस्थापक श्री. गौरीश भगत उपस्थित होते.

या सर्वांगसुंदर कार्यक्रमात, सुरमणी श्री. धनंजय जोशी यांनी सादर केलेल्या "मूर्त तुझे सुंदर देवा", "अबीर गुलाल", "पद्मनाभा नारायणा", "नाही पुण्याची मोजणी", "राम नाम ज्याचे मुखी", यांसारख्या लोकप्रिय अभंगांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सौ. धनश्री गाडगीळ–फडके यांनी "अमृताहुनी गोड नाम तुझे देवा", "दिनांची माऊली आजी म्या देखियली", "बोलावा विठ्ठल", "आम्हा न कळे ज्ञान", "कुणीतरी सांगा काहीतरी सांगा", ही भक्तीगीते अप्रतिमरित्या सादर करुन श्रोत्यांना भारावून टाकले.

या गायक कलाकारांना श्री. रोहिदास परब(तबला), श्री. सुभाष फातर्पेकर(संवादिनी), श्री. हेमंत तिवटे(पखवाज), श्री. जयराम सावंत(तालवाद्य) यांनी उत्कृष्ट साथ दिली. प्रा. डॉ. सचिन वायगांवकर यांच्या सखोल अभ्यासातून साकारलेले समर्पक आणि रसपूर्ण निवेदन कार्यक्रमाची रंगत वाढवणारे ठरले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कला अकादमीचे कार्यक्रम आणि विकास अधिकारी श्री. प्रदीप गांवकर यांनी प्रास्ताविक करुन सर्व कलाकारांचे व मान्यवर श्रोत्यांचे स्वागत केले. या भक्तीरसाने ओथंबलेल्या कार्यक्रमाने उपस्थित रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबत:फोटो

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)